20 JAN 2023 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठीय कुस्ती रविवारपासून

## शिवाजी विद्यापीठात आयोजन; एक हजार ९७९ मल्लांचा सहभाग

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठात २२ ते २९ दरम्यान आंतरविद्यापीठीय कुस्ती स्पर्धा होत आले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्दी वर्षानिमित्त आणि शिवाजी विद्यापीठाच्या हिरक महोत्सवनिमित्त विद्यापीठाने आयोजकत्व घेतले आहे. स्पर्धेत १७२ विद्यापीठांतील एक हजार ९७९ मल्ल सहभागी होणार आहेत. फ्री स्टाईल व ग्रीको रोमन प्रकारात स्पर्धा विद्यापीठातील राजमाता जिजाऊ माँसाहेब सभागृहात चार मॅटवर होईल. ही माहिती क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी आज दिली.



ते म्हणाले, ''स्पर्धेचे उद्‍घाटन सोमवारी (ता.२३) सायंकाळी चारला कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली आहे. श्रीमंत शाहू महाराज छत्रपती प्रमूख पाहुणे आहेत. हिंदकेसरी दिनानाथ सिंह, प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ए. आय. यु. चे निरीक्षक प्रा. डॉ. सुरेश कुमार मलिक उपस्थित असतील. पहिल्या दिवशी ५७, ६५, ७४, ८६ किलो वजनी गटातील सामने आहेत. सोमवारी ६१, ७०, ७९, ९७ किलो वजनी गटाचे सामने होतील. तिसऱ्या दिवशी ९२ आणि १२५ किलो वजनी गटातील सामने होतील. या १० वजनी गटात फ्री स्टाईल सामने होतील. बक्षीस समारंभ ता. २४ ला संपआहे. ग्रीको रोमन स्पर्धा २७ ते २९ दरम्यान आहे. ता. २७ ला ५५, ६३, ७२, ८२, ता. २८ ला ६०, ६७, ७७, ९७ तसेच ता. २९ ला ८७ आणि १३० किलो वजनी गटातील लढतील होतील. बक्षीस समारंभ त्या दिवशी सायंकाळी पाचला आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावरील एकूण ५० पंचांची नियुक्ती केली आहे. स्पर्धेतून खेलो इंडिया स्पर्धेसाठी पहिल्या आठ मल्लांची निवड होणार आहे. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलगुरू डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. डॉ. अभिजीत वणिरे उपस्थित होते.

**विद्यापीठाचे २० मल्ल**

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील २० मल्ल सहभागी होतील. स्पर्धा स्थळी इलेक्ट्रॉनिक गुण बोर्ड आहे. सर्व सामने विद्यापीठाच्या 'शिववाहिनी' या युट्युब चॅनेलवर प्रक्षेपित होतील. सर्व मल्लांची निवास व्यवस्था वसतिगृहात आणि गेस्ट हाऊसमध्ये आहे.

जनसंपर्क कक्ष
20 JAN 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात रविवारपासून कुस्ती स्पर्धा

## आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धा : दोन हजारांहून अधिक स्पर्धक येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात येत्या रविवारपासून तब्बल सात दिवस शड्डूचा आवाज घुमणार आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्मृतिशताब्दी वर्ष व शिवाजी विद्यापीठाच्या हीरक महोत्सवानिमित्त २२ ते २९ जानेवारीदरम्यान फ्रीस्टाईल व ग्रीको-रोमन कुस्ती स्पर्धा आयोजित केल्या आहेत. या स्पर्धेत देशातील १७२ विद्यापीठांतील दोन हजारांहून अधिक स्पर्धक सहभागी होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना शुक्रवारी दिली.

स्पर्धेचे उद्घाटन शाहू छत्रपती व हिंदकेसरी दीनानाथ सिंह, अखिल भारतीय विद्यापीठ असोसिएशनचे निरीक्षक डॉ. सुरेशकुमार यांच्या उपस्थितीत होणार आहे. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ मांसाहेब सभागृहात होणाऱ्या या स्पर्धा दोन टप्प्यांत होणार आहेत. रविवारी दि. २२ ते २४ जानेवारीदरम्यान फ्री स्टाईल प्रकारात सहभागी झालेल्या मल्लांची वजने सकाळी सहा वाजता घेतली जाणार आहेत. त्याच दिवशी ५७, ६५, ७४ आणि ८६ किलो वजनी गटातील स्पर्धा होईल. दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि. २३) ६१, ७०, ७९ आणि ९७ किलो, तर मंगळवारी (दि. २४) ९२ आणि १२५ किलो गटातील स्पर्धा होईल.

शुक्रवारी (दि. २७) ते २९ जानेवारीदरम्यान ग्रीको रोमन स्पर्धा होईल. पहिल्या दिवशी ५५, ६३, ७२ आणि ९७ किलो गटातील, तर दुसऱ्या दिवशी (दि. २८) ला ६०, ६७, ७७ व ९७ किलो आणि रविवारी (दि. २९) ८७ आणि १३० किलो वजनी गटातील स्पर्धा होणार आहे. याच दिवशी बक्षीस समारंभ होईल. स्पर्धेसाठी पंचाच्या निर्णयाशी हरकत घेण्यासाठी डीआरएस इलेक्ट्रॉनिक्स सिस्टमचा वापर केला जाणार आहे. स्पर्धेतून खेलो इंडिया स्पर्धेसाठी प्रथम ८ क्रमांक प्राप्त कुस्तीगीरांची निवड केली जाणार आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात २२ पासून अ. भा. आंतर विद्यापीठ कुस्ती स्पर्धा

## पुरुषांच्या फ्री स्टाईल व ग्रीको रोमन प्रकारात देशभरातील २ हजार स्पर्धकांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्मृती शताब्दी वर्ष आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सवानिमित्त कोल्हापुरात दि. २२ ते २९ जानेवारी या कालावधीत अखिल भारतीय फ्री स्टाईल व ग्रीको रोमन पुरुषांच्या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात चार मॅट्सवर या स्पर्धेतील लढती रंगणार असून यात देशभरातील १७२ विद्यापीठांतील सुमारे २ हजार स्पर्धक सहभागी होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्पर्धेतर्गत दि. २२ ते २४ जानेवारी या कालावधीत फ्री स्टाईल कुस्ती होईल. १० वजन गटात एकूण ११८३ खेळाडूंनी सहभाग नोंदविला आहे. तर दि. २७ ते २९ जानेवारी या कालावधीत होणाऱ्या ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेमध्ये ७९६ कुस्तीपटू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन दि. २३ जानेवारी रोजी सायंकाळी ४ वाजता, शाहू महाराज यांच्या हस्ते आणि कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होईल. यावेळी हिंदकेसरी दीनानाथसिंह, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एआईयूचे निरीक्षक प्रा. डॉ. सुरेशकुमार मलिक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. बक्षीस समारंभ दि. २४ रोजी सायंकाळी ५ वाजता होईल. ग्रीको रोमन स्पर्धा दि. २७ ते २९ जानेवारी या कालावधीत होईल. ही स्पर्धाही विविध १० वजन गटांसाठी होईल. बक्षीस समारंभ दि. २९ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता होईल.

यावेळी प्रकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, प्रा.डॉ. अभिजित वणिरे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# विद्यापीठात २२ पासून कुस्ती स्पर्धा

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्ष आणि शिवाजी विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवानिमित्त अ. भा. आंतरविद्यापीठ कुस्ती फ्री स्टाईल व पुरुष गटातील ग्रीको रोमन स्पर्धेचे आयोजन केले आहे. दि. २२ ते २९ जानेवारी या कालावधीत ही स्पर्धा होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये होणाऱ्या या स्पर्धेचे उद्‌घाटन २३ जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी हिंदकेसरी दीनानाथ सिंह, एआययूचे निरीक्षक प्रा. डॉ. सुरेश कुमार मलिक उपस्थित राहणार आहेत.


डॉ. शिर्के म्हणाले, दोन वर्षांपासून या स्पर्धेच्या यजमानपदासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. यासाठी देशभरातील १७२ विद्यापीठांमधील १९८० खेळाडू सहभागी होणार आहेत. दि. २२ ते २४ या कालावधीत १० वजन गटात फ्री स्टाईल कुस्ती स्पर्धा होणार असून ११८३ स्पर्धकांचा सहभाग आहे, तर २७ ते २९ जानेवारी या कालावधीत ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धा होणार असून यामध्ये ७९६ स्पर्धक सहभागी आहेत. स्पर्धेदरम्यान वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना घरी जाण्याच्या सूचना दिल्या आहेत. सर्व अधिविभाग बंद राहणार असून ऑनलाईन वर्ग होतील, असे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी सांगितले.

लोकमत

# आयस्टीमकडून आर. जी. सोनकवडे यांना निमंत्रण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. आर. जी सोनकवडे यांना भारतीय विज्ञान संस्थेमार्फत बंगळुरू येथे होणाऱ्या कार्यक्रमात व्याख्यान देण्यासाठी निमंत्रित केले आहे.



शिवाजी विद्यापीठात उपलब्ध असलेल्या सैफ डीएसटी सीएफसी सुविधांचे आणि तेथे भारतीय विज्ञान, तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी सुविधा नकाशांचा प्रभावीपणे (I-STEM) पोर्टलचा वापर करत आहे. यावर आधारित व्याख्यान देण्यासाठी त्यांना निमंत्रित केले आहे. संशोधन आणि प्रयोगशाळांच्या विकासाच्या तांत्रिक व्यवस्थापन कौशल्यांवर चर्चा करून काही परिणाम तयार करण्यासाठी हे व्यासपीठ असणार आहे. भारतीय विज्ञान संस्था ही विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वांत जुनी आणि प्रमुख संस्था आहे. या व्यासपीठावर व्याख्यान देण्यासाठी महाराष्ट्रातील बहुतांश विद्यापीठातून प्रा. सोनकवडे यांना तज्ज्ञ म्हणून निमंत्रित करण्यात येते.

तरूण भारत

# डॉ. आर. जी. सोनकवडे यांना बंगळूर येथे व्याख्यानाचे आमंत्रण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सैफ-डीएसटी सेंटरमधील सोयी-सुविधा, येथील तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे होणारा वापर, तसेच इंडियन सायन्स, टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड इंजिनिअरिंग फॅकल्टीज मॅप पोर्टचा वापर कसा करायचा या विषयावर व्याख्यान देण्यासाठी डॉ. आर. जी. सोनकवडे यांना बंगळूर येथे अमंत्रीत केले आहे. १९ व २० जानेवारी रोजी बंगळूर आयआयएससी येथे व्याख्यानाचा कार्यक्रम होणार आहे.



- **शिक्षण क्षेत्रातून शुभेच्छा**
- **आयसीआयएससीतर्फे बंगळूर येथे होणार कार्यक्रम**
- **डॉ. सोनकवडे यांनी मानले वैज्ञानिक प्रमुखांचे आभार**

संशोधन आणि प्रयोगशाळांच्या विकासाच्या तांत्रिक व्यवस्थापन कौशल्यांवर चर्चा करून काही परिणाम तयार करण्यासाठी हे व्यासपीठ असणार आहे. शिवाजी विद्यापीठ आणि सैफ केंद्रासाठी हि अभिमानाची गोष्ट आहे. डॉ. सोनकवडे यांचा प्रशासकीय अनुभव आणि शिवाजी विद्यापीठातील त्यांची शैक्षणिक कामगिरी बऱ्याच शैक्षणिक संशोधनांद्वारे सर्वदूर पसरली आहे. आयआयएससीकडून महाराष्ट्रातील राज्य विद्यापीठातून केवळ डॉ. सोनकवडे यांनाच तज्ज्ञ म्हणून निमंत्रित केले आहे. त्यांना मान्यता दिल्याबद्दल डॉ. सोनकवडे यांनी आय-सीटीईएम आणि भारत सरकार वैज्ञानिक प्रमुखांचे आभार मानले.

पुढारी



कोल्हापूर : मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त लेखक संवाद कार्यक्रमात लेखक कृष्णात खोत यांच्याशी संवाद साधताना प्रा. डॉ. रणधीर शिंदे, डॉ. गोमटेश्वर पाटील.

# वाचन हाच लेखकाचा रियाज : खोत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

समकाळापेक्षा गतकालीन सांस्कृतिक संचित, निसर्ग, मानवी जीवनानुभव यावर आधारित कल्पिलेले साहित्य व्यक्तिगत महत्त्वपूर्ण वाटते. वाचन हाच लेखकांचा रियाज असतो, असे प्रतिपादन लेखक कृष्णात खोत यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त लेखक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. मराठीतील नामवंत लेखक कृष्णात खोत यांच्याशी प्रा. डॉ. रणधीर शिंदे व महावीर महाविद्यालयातील प्रा. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी लेखकांची संवाद साधला.

याप्रसंगी डी.आर. माने महाविद्यालय महावीर महाविद्यालय, नाईट कॉलेज, स्वामी विवेकानंद महाविद्यालयामधील मराठी विभागाचे प्रा. नीला जोशी, प्रा. शरद गायकवाड, प्रा. अरुण शिंदे, प्रा. प्रदीप पाटील व त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. प्रमुख पाहुणे यांचा परिचय संशोधक विद्यार्थी राजेश पाटील यांनी करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी आभार मानले.

पुढारी

# 'महर्षी शिंदे व सर्वसमावेशक भारताची संकल्पना' विषयावर २४ पासून राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्यावतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त 'महर्षी शिंदे आणि सर्वसमावेशक भारताची संकल्पना' या विषयावर दि. २४ व २५ जानेवारी रोजी वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृह येथे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

चर्चासत्राचे बीजभाषण ज्येष्ठ विचारवंत प्रा. आ. ह. साळुंखे करणार आहेत. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. चर्चासत्रामध्ये प्रा. गोपाळ गुरू, किशोर बेडकिहाळ, प्रा. अशोक चौसाळकर, हेमंत राजोपाध्ये, प्रा. जयसिंग सावंत, डॉ. अवनीश पाटील, प्रा. प्रकाश पवार, प्रा. टी. एस. पाटील, प्रा. श्रुती तांबे, प्रा. भारती पाटील, प्रा. गोविंद काजरेकर, डॉ. दत्ता घोलप, सुशील धसकटे, प्रा. प्रवीण बांदेकर सहभागी होणार आहेत. चर्चासत्राच्या समारोपासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत प्रा. जयसिंगराव पवार हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील असतील, अशी माहिती प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

पुढारी

# नॅनो सायन्सच्या विद्यार्थ्यांची दक्षिण कोरिया येथे पीएच.डी.साठी निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागातील दोन विद्यार्थी सौरभ थोरवत, प्रीती शिंदे यांची दक्षिण कोरिया येथील क्युंग ही व संक्युकवान युनिव्हर्सिटी येथे अप्लाईड फिजिक्स व केमिकल इंजिनिअरिंग विषयात पीएच.डी.साठी निवड झाली आहे. त्यांना अधिविभागातील रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. सुशीलकुमार जाधव यांचे मार्गदर्शन मिळाले. दोघांनी २०१७ ते २०२२ या कालावधीमध्ये बीएससी-एमएससी नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे. एमएससीपर्यंत तीन शोधनिबंध वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रसिद्ध केले आहेत. कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, प्रभारी संचालक डॉ. किरण कुमार शर्मा आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

पुण्यनगरी

# महर्षी शिंदे अध्यासनतर्फे २४ रोजी चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त महर्षी शिंदे आणि सर्वसमावेशक भारताची संकल्पना विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. दि. २४ व २५ जानेवारी या कालावधीत वि. स. खांडेकर भाषाभवन सभागृहात ज्येष्ठ विचारवंत प्रा. आ. ह. साळुंखे मार्गदर्शन करणार आहेत. उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र.कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत होईल. यावेळी प्रा. गोपाळ गुरू, किशोर बेडकिहाळ, प्रा. अशोक चौसाळकर, हेमंत राजोपाध्ये, प्रा. जयसिंग सावंत, डॉ. अवनिश पाटील, प्रा. प्रकाश पवार, प्रा. टी. एस. पाटील, प्रा. श्रुती तांबे, प्रा. भारती पाटील, प्रा. गोविंद काजरेकर, डॉ. दत्ता घोलप, सुशील धसकटे, प्रा. प्रवीण बांदेकर आदी सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ विचारवंत प्रा. जयसिंगराव पवार यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे, अशी माहिती समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.


सकाळ

# डॉ. राजेंद्र सिंह राणा उद्या शिवाजी विद्यापीठात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स यांच्यातर्फे जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंह राणा यांचे 'पंचगंगा - पूर आणि प्रदूषण' या विषयावर मार्गदर्शन होणार आहे. शिवाजी विद्यापीठ मुख्य इमारतीतील सिनेट हॉलमध्ये मार्गदर्शनासह चर्चासत्राचे आयोजन शनिवारी (ता.२१) दुपारी सव्वा चार वाजता होणार आहे. येथे दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार होणार आहेत. चर्चासत्राच्या अध्यक्षपदी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के असतील. यावेळी शिवाजी विद्यापीठ आणि असोसिएशन ऑफ आर्किटेक्टस् अँड इंजिनिअर्स यांच्यामध्ये सामंजस्य करार केला जाणार आहे. यामध्ये दोन्ही संस्थांच्या वतीने विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष माहिती, ज्ञान मिळवून देणे व त्यादृष्टीने विविध उपक्रम हाती घेऊन नियोजन करण्याचे निश्चित केले आहे. दोन्ही संस्थांच्या वतीने एकत्रित उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

तरूण भारत

# विद्यापीठ अधिसभेवर धर्यशील यादव यांची नियुक्ती



**कोल्हापूर :** कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी धैर्यशील यादव यांची अधिसभा सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. यादव सध्या वित्त व लेखा विभागात कार्यरत असून अतिथीगृहाचा अधिकचा कार्यभार सांभाळत आहेत. विद्यापीठाचे उतकृष्ट कर्मचारी म्हणून त्यांचा गौरव झाला आहे. नॅक मूल्यांकनात त्यांचा सक्रीय सहभाग आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबाबत त्यांचे विद्यापीठ कर्मचारी, अधिकाऱ्यांकडून अभिनंदन होत आहे. यादव यांनी विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभागात काम केले आहे. प्लास्टिक बाटली बंद करून पिण्याच्या पाण्यासाठी स्टिलचा तांब्या वापरण्याची सवय विद्यापीठाला लावली आहे. विद्यापीठाची सर्व परिपत्रके ई-मेलव्दारे पाठवण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. अग्रणी महाविद्यालय योजना प्रभावीपणे राबवली आहे. कोल्हापूरचे दुसरे महापौर नानासाहेब यादव व कॉंग्रेसचे पहिले आमदार लालासाहेब यादव हे त्यांचे काका आहेत. या निवडीसाठी त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले शिवजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले, डॉ. वैभव ढेरे, अभिजीत रेडेकर, एम. जे पाटील यांचे सहकार्य लाभले.